# प्रभुतरुण

वर्ष ४९ | अंक ९ | मुंबई | मार्च २०१६ | पाने ६ | किंमत रु. १

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर**

*कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटये**

*संपादकीय*

## निर्भय, यशस्वी भव!

**—सुहासिनी कीर्तिकर**

तुम्हाला हेरंब कुलकर्णी माहीत आहेत का? गावागावातून भरणाऱ्या शाळांना ‘आनंद भुवन’ कसं बनवता येईल; यासाठी निरीक्षण, परीक्षण करणारे हेरंब कुलकर्णी प्रयोगशील शिक्षक. बालवाडीत एका दिशेनं खुर्च्या मांडून शिक्षकाभिमुख विद्यार्थी बसतात; त्याला आक्षेप घेणारे. तोत्तोचानची शाळा रेल्वेच्या डब्यात भरायची ना? त्याची आठवण करून देणारे हेरंब कुलकर्णी. त्यांनी नुकतंच ‘जे. कृष्णमूर्ती आणि कृष्णमूर्ती स्कूल्स’ हे पुस्तक लिहिलंय. त्यातलं एक प्रकरण ‘लोकमुद्रा’च्या ताज्या अंकातून माझ्या वाचनात आलं. तर; आजच्या या लेखात त्याविषयीच थोडंसं...

जे. कृष्णमूर्तींनी एक विधान केलं आहे. धक्कादायक असंच. ‘शाळा आणि तुरुंग या जगातील दोनच जागा अशा आहेत की, जिथे कोणीच स्वत:हून जात नाही. तिथे दाखल करावे लागते.’ बापरे! हेरंब कुलकर्णींना हे वाक्य वाचून असा प्रश्न पडतो की खरंच जर पालकांनी आणि शिक्षकांनी मुलांच्या इच्छेवर सोडलं, शाळेत जाण्याचा आग्रह धरला नाही तर? किती मुलं स्वत:हून ‘शाळेला जातो आम्ही’ असं आनंदानं म्हणत शाळेत टिकतील? वाचकहो, माझ्याही मनात आलं की शाळेशिवाय ही मुलं घडतील का? नारायण सुर्वे हा कवी चौथी पास होता. पण गॉर्कीची ‘आई’, लेनिनचं चरित्र, केशवसुत - मर्ढेकरांची कविता त्यांनी वाचन - चिंतनातून पचवली ती शाळेशिवायच. अरुण शेवतेंनी तर ‘नापास मुलांची गोष्ट’ हे पुस्तकच संपादित केलंय. त्यात शरद पवार आहेत, अभिनेते अतुल कुलकर्णी आहेत अन् असे आणखी बरेचजण. शालेय शिक्षणपद्धती आपल्याकडे आहे. शालेय शिक्षणमंत्रीही आहेत; पण शिक्षणाचा मंत्र? तंत्राबरोबरच ‘मंत्र’ हवा! हे माझ्या मनातील विचार हो आपले बापुडे!

हेरंब कुलकर्णी एक हमखास येणारा अनुभव सांगतात. तो असा - ‘एरवी शांत असलेली शाळा जेव्हा सुटते तेव्हा प्रचंड गलका होतो. मुलं आनंदाने ओरडू लागतात. त्यांच्या त्या उत्स्फूर्त गोंगाटाचे रहस्य काय? जेव्हा उद्या शाळेला सुट्टी आहे, असे शाळेत सांगीतले जाते तेव्हाही टाळ्या वाजतात आणि आनंदाचे चित्कार उठतात. सारी लक्षणं हेच सांगतात की शाळेत मुलांना आम्ही डांबून ठेवतो आहोत आणि रोज शाळा सुटताना ते तो मुक्तीचा आनंद साजरा करतात. शाळा सुटताना त्यांचा तो गोंगाट काही काळ का होईना, त्या सक्तीविरुद्धचे बंड असते. त्यातही मुलं काही ना काही कारण काढून शाळेपासून सुटका करून घेतात ती वेगळीच. उत्स्फूर्त गोंगाटावरून मंडळी; माझ्या मनातील एक अनुभव तरंगत वर आला. मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या दादर येथील संदर्भ विभागात मी एकेकाळी नियमित जायचे. अभ्यासासाठी, मुक्त वाचनासाठी. संदर्भ विभाग पहिल्या मजल्यावर. वरच्या मजल्यावर मूकबधिर मुलांसाठी शाळा भरते. शांतता अनुभवत अभ्यास चाललेला असताना विशिष्ट वेळी गलबला, नुसता गलबला ऐकू यायचा. हाच ‘उत्स्फूर्त गोंगाट’. बोलता येत नाही; पण खाणाखुणा आहेत. त्या भाषेला थोडाफार स्वरही जोड देतो आहे. या स्वराचाच एक ‘सुटके’चा आवाज असायचा. कळायचं की शाळा सुटली!

हेरंब कुलकर्णींनी याला आधार म्हणून एका विदेशी विदुषीचा दाखला दिला आहे. ही विदुषी म्हणते, ‘युद्धात जसा एखादा कुशल सेनापती शत्रूच्या तलवारीचे वार चुकवतो. तशी मी बालपणी शाळा चुकवीत होते.’ किती प्रातिनिधीक वर्णन आहे

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## Our Super-Woman – Vidula!

**-मयुरा गुंजारव नायक**



Vidula Kanitkar Kothare – I am so delighted to get this opportunity to announce such a great achievement of a dear friend. To be featured in a book as a "SuperWoman" for her success as an entrepreneur indeed calls for accolades! The author Prachi Garg in her book "Super Women – Inspiring Stories of 20 Women Entreprenuers" has covered women achievers, dedicating a chapter to each Diva. The coverage on Vidula was rather nostalgic to me. It talks of her journey from her decision to pursue her career in art, through the formation of Think Creative Pvt. Ltd. It takes us through their hardships and their tough, but memorable journey of transforming a small agency they founded with a single client and a single computer to a full-fledged Advertising and Marketing Solutions provider. In times when many creative agencies were shutting shop, Think Creative has not just prevailed, but with a vision to diversify in various fields of communication solutions, have excelled to become a dependable service provider for their innumerable clients. While I am sure this is a joint effort of the three founders along with their troop of 15 employees, still, Vidula stands out to be a sure, strong and rooted pillar of Think Creative.

It was a pleasure to read about this woman whom I have closely observed over more than a decade that I have known her. The success story of Think Creative Pvt. Ltd. Is not new to me! We have been friends since even before the inception of Think Creative, when I knew Vidula as the would-be wife of our dear friend Nikhil /Shrinal Kothare! Those days of struggle when three partners got together to start a venture, their struggle to prove their mettle, the challenges of running a start-up agency with conservative investments, from acquiring new clients to retaining existing ones in a dynamic industry like Advertising where the "Jungle Rule" follows where survival is at stake! This agency has come a long way! But I am yet to remember a day when I have seen a frown on Vidula’s face, or even a sign of dismay or pressure about their struggle. She exuberates confidence and perfectly compliments Nikhil in running the show shoulder to shoulder with their partner Hitesh. Over these years, I have seen her as a wonderful life partner to a dear friend, a loving daughter-in-law/sister-in-law, a doting mother, a very creative professional but above all, a warm and pleasant person.

With all her business

(पान २ कॉलम ३ वर)

संपादकीय

(पान १ कॉलम २ वरून)

ना! 'टॉम सॉयर'ही बाललीलांचा अन् क्लुप्त्यांचा आधार घेऊन हेच करायचा; म्हणूनच आपल्याला आवडायचा ना! मी वर नारायण सुर्वेंच्या शिक्षणाचा उल्लेख केला. हेरंबही अशी उदाहरणे देतात. रवीन्द्रनाथ टागोरांनी तिसरीत शाळा सोडली. अण्णाभाऊ साठे हे केवळ तीन दिवसच शाळेत जातात आणि शिक्षकांनी मारल्याने शाळा सोडतात. पुढे 'साहित्य सम्राट' होतात. म्हणूनच कृष्णमूर्ती यांचे अवलोकन महत्त्वाचे आहे. 'आमच्या शाळा बालककेंद्री नाहीत. तिथली शिस्त तुरुंगातल्या शिस्तीसारखी आहे.' मोठ्या माणसांची ती गरज आहे. ही गरज अधोरेखित करण्यासाठी कुलकर्णी एक समर्पक उदाहरण देतात - औरंगजेबाने आपल्या वडिलांना तुरुंगात टाकले. नंतर त्यालाच बापाची दया आली. त्याने बापाला निरोप पाठवून विचारलं की तुला काय हवंय? बाप म्हणाला, ''रोज काही मुलं पाठवीत जा. त्यांची शाळा भरवीन. त्यांना कुराण शिकवीन.'' बापाच्या या मागणीवर रजनीशांनी फार सुंदर भाष्य केलं आहे. ते म्हणतात की, 'तुरुंगात गेला तरी त्याला राजाच व्हायचं होतं. त्याला रोज मुलांचा दरबार भरवून राजेपणाचा गेलेला आनंद मिळवायचा होता. हुकमत गाजवायची होती.' कुलकर्णी हा दृष्टान्त देऊन पुढे म्हणतात, 'शाळा या मोठ्या माणसांना आपला अहंकार सुखावयाच्या, हुकमत गाजवायच्या हक्काच्या जागा वाटतात का? याचे 'हो' किंवा 'नाही' उत्तर न देता स्वत:ची पडताळणी करायला हवी. हे पालकांच्या बाबतीतही तितकेच खरे आहे. आमची मुले ही आमच्या अहंकार विस्ताराची, अहंकार गाजवायची ठिकाणे आहेत का? हे तपासायला हवे. अशामुळे शाळांइतकीच घरंही मुलांसाठी तुरुंग बनली आहेत. स्वत:च्या आत्ममग्नतेतून बाहेर येऊन आम्हाला निरपेक्ष प्रेम करावे लागेल. प्रेम हीच घराची आणि शाळेची भाषा बनवावी लागेल. तेव्हाच शाळा आणि तुरुंगातील साहचर्य संपेल.

किती खरं आहे ना! आज पालकही मुलांना त्यांच्या मते चांगल्या शाळेत घालतात. म्हणजे सुविधा, आधुनिकता, प्रचंड फी अन अनंत नियमावली असलेल्या शाळेत. ती घरापासून लांब असेना का! एक दीड तास आधी निघून 'स्कूलबस' गाठता येते. शाळेतच 'स्वीमिंग', 'रायडिंग', ड्रॉईंग... अन असेच कसले कसले क्लास... अगदी 'झुम्बा' डान्सचेही... मुलांना कह्यात घेण्याठी टपलेले असतात. सिनेमातली गाणीच 'गाण्याच्या क्लास'मध्ये असतात. त्या सगळ्यातून सुटका होऊन मुलं 'वीकेण्ड' साजरा करणार म्हटलं की आईवडिलांना त्यांचा 'अभ्यास कर'चा चाबूक उगारावासा वाटतो. उद्याच्या मरणाला सामोरं जाण्याआधी बिचाऱ्या मुलांना ऐन रात्री नऊ वगैरे वाजता 'होमवर्क' आठवतं. मग काय? चाबकाचा फटकारा वाजतोच. ''दिवसभर काय केलंस? टी.व्ही. बघायला कुणी सांगीतलं? शाळेत 'हे' येणारेका?'' म्हणजे पहा, मनोरंजन मुलांना हवं तसं नाही, तर शाळाच महत्त्वाची. शिवाय मोतीजड असे क्लासेस, ट्यूशन्स आहेतच. 'ए बाबा, आपण संध्याकाळी गार्डनला जाऊ या?' असा प्रश्न आलाच कोवळा होऊन; तर कोंडीत पकडणारा निबर प्रश्न येतोच - 'टेबल्स केलीस?' मग पार्कला जाणं, शॉपिंगला जाणं किंवा गंमतीखातर केवळ भटकणं यांना 'चेकमेट' केल्यासारखे पालक बिनधास्त 'टी.व्ही.' लॅपटॉप, फोन यांना भिडायला तयार! म्हणजे काय? मुलांना 'घर नावाची शाळाच' असते ती. जिथून त्यांची सुटका नाही. पूर्वीसारखी शेजारची मुलं घेऊन घरात वा परिसरात धुडगूस घालायचीही सोय नाही त्यांना. मग 'कुणी बिचारी मुकी हाका'.. अशी ही मुलं 'व्हॉटस् ॲप'च्या जाळ्यात अडकतात, मनोरंजन करून घेतात. मन म्हणजे काय; हे न समजताच. शिवाय घराघरामध्ये या मुलांचा 'त्यांचा त्यांचा' असा टी.व्ही. किंवा कॉम्प्युटर असतोच!

शाळा आणि घर यांची भाषा प्रेम हीच असली पाहिजे असं कृष्णमूर्तींना वाटतं ना; ते याकरिता. शाळेचे लौकिक यश न पहाता जीवनातल्या छोट्या छोट्या आनंदाची शाळा कशी लयलूट करते; हे पाहिले गेले पाहिजे असे कृष्णमूर्ती म्हणतात. ती 'आनंदाची शाळा' गर्दीची शाळा असता कामा नये असे त्यांना वाटते. आनंदाची शाळा म्हणजे काय? तर तेथे 'भीती' असता कामा नये. घरात, शाळेत भीती असेल तरच मुलं चांगली वागतील किंवा शिकतील असे दुर्दैवाने शासन, शाळा, घर व समाज या सर्वांनाच वाटते. हे गृहितकच चुकीचे आहे. कृष्णमूर्तींना ते मान्य नाही. ते म्हणतात 'भीती हा रोगच आहे. ती चिघळत जाणारी जखम आहे. भीती मनाला पंगू करते.' म्हणूनच ते पुढे म्हणतात, 'भीती नसेल तरच मुलं शिकू शकतात.' गांधीजींनी हाच संदेश दिलाय ना? 'निर्भय बनो!' स्पर्धा आली की तुलना आली, भीती आली. 'घोका आणि ओका' अशी परीक्षापद्धती आली.

आज अशीच परीक्षापद्धती आहे! समाज या परीक्षेच्या गुणांवरच विद्यार्थ्यांला पुढे जाऊ द्यावयास राजी आहे. दुर्दैवाने 'कराग्रे वसते लक्ष्मी करमध्ये सरस्वती' मधील 'अग्रे' वसणाऱ्या लक्ष्मीसाठीच सरस्वतीला वेठीला धरले जातेय. 'कृष्णमूर्ती स्कूल्स' संमगरवरी स्वप्नच ठरतेय. पण आपण थोडं थांबून यावर विचार करण्याची खरोखरीच गरज आहे. हेरंब कुलकर्णी यांनी हे पुस्तक लिहून त्याला चालना दिली आहे. पण तोवर?

तोवर या परीक्षा पद्धतींना, शिक्षण चौकटींना सांभाळतच आपल्याला पुढं जायचं आहे. आता या महिन्यापासून परीक्षांचा 'मौसम' सुरू होतोय. या परीक्षांना सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना (की परीक्षार्थींना!) माझ्या मनापासून शुभेच्छा! सांगणं इतकंच की या बंदिस्त पद्धत असलेल्या परीक्षांना सामोरे जाताना निर्भय बना. या विद्यार्थ्यांच्या पालकांना विनवणी इतकीच की मुलांच्या मनातील परीक्षेचे भय वाढवू नका; त्यांना 'प्रेम' द्या.

'प्रेम द्यावे', प्रेम घ्यावे' हा साने गुरुजींचा मंत्र वागण्यातून 'वागवून' विद्यार्थ्यांसाठी 'पालकपरीक्षा' उत्तम द्या. खरंय ना? ही केवळ विद्यार्थ्यांचीच नव्हे; तर आपलीही पालकपरीक्षा आहे! त्यात उत्तमरीत्या 'पसार' होण्यासाठी (पूर्वी 'परीक्षा पसार झाला / झाली' अशी भाषा असे!) विद्यार्थ्यांच्या जोडीने तुम्हा सगळ्यांनाही माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा!

यशस्वी भव!

*

विस्तारित संपादकीय

(पान १ कॉलम ४ वरून)

responsibilities, she has effortlessly managed her duties towards her family. Her sister-in-law Sanjana, being a dear friend to me, has often mentioned how proud she feels of Vidula for managing her responsibilities as a daughter-in-law along with her demanding work profile. We all struggle to manage home and work together, but being able to fight this struggle with a smile on the face is what makes a woman stand apart the others! When work is passion that gratifies our soul, but along with work we also embrace our duties towards family is when we release positivity and that's exactly what Vidu is all about!

In her busy schedule she has always made time for all the creative requirements of Prabhu Tarun. Think Creative has been designing for the "Diwali Anka" cover page for many years! They designed the logo of Pratyush – One of the most popular events in the history of Prabhu Tarun. I take this opportunity to mention their contribution towards our magazine. I will not thank them, as that would be-little their emotions towards Prabhu Tarun which has been as dear to them as us! I wish all the success to this Woman of Substance, her business as well as her personal endeavours and may she reach higher pinnacles of success in the years to come. I conclude saying, that I am very proud to know you Vidula, and Pathare Prabhus will be very glad that you belong to us!

*

## पाठारे प्रभु चॅरिटीज

✶ दरवर्षीप्रमाणे चॅरिटीजने विनामूल्य असे वैद्यकीय शिबीर ७-२-१६ रोजी सकाळी १०.३० ते १.३० या वेळेत ठाकुरद्वारच्या सुरेश विठ्ठल सभागृहात आयोजित केले होते. हे ४६ वे शिबीर होते आणि याचा लाभ एकूण ६२ जणांनी घेतला. गेल्या वर्षी ४३ जणांनी घेतला होता; त्यामुळे यावर्षीची लाभार्थींची संख्या लक्षणीय म्हणायला हवी. विश्वस्त डॉ. प्रदीप गजानन विजयकर यांनी हे शिबीर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. यावर्षी हाडांची घनता तपासणीही आयोजित केली होती. या शिबीरात डॉ. अरुण वा. जयकर, डॉ. प्रदीप ग. विजयकर, डॉ. सुनील दत्तात्रय आगासकर, डॉ. विद्याधर सुनील आगासकर, डॉ. ऋतुजा भगत, डॉ. तन्मय प्रदीप विजयकर, डॉ. सौ. प्रीती बी. जयकर, डॉ अमित जे. धुरंधर, डॉ. कु. वैशाली एन. अजिंक्य, डॉ. फुलेन्द्र कोठारी, श्री. नितीन जे. कोठारे आणि सौ. रजनी नीतिन कोठारे यांचे योगदान होते. डॉ. सौ. प्रीती भालचंद्र जयकर यांनी कॅन्सर रोगाबद्दल माहिती सांगून तत्संबंधी संरक्षणात्मक, सावधगिरी कोणती बाळगायची याविषयी शिबीरार्थींना व्याख्यानातून मार्गदर्शन केले.

✶ पाठारे प्रभु चॅरिटीजची अहवालपत्रिका नेहमीप्रमाणे घरोघर पोहोचली. या पत्रिकेतील माहितीनुसार श्री. सुधीर दुर्गाकांत व्यवहारकर यांची चॅरिटीजच्या विश्वस्तपदी नेमणूक झाली. त्यांचे अभिनंदन. या अहवालात बक्षिस समारंभाची विलोभनीय छायाचित्रे आणि समारंभाचा वृत्तान्त आहे. श्री. रंजन खंडेराव विजयकर, सौ. अपर्णा समीर विजयकर यांच्या नितांतसुंदर प्रतिक्रिया आहेत; तर स्वाती तारकनाथ जयकर यांचे प्रतिक्रिया देणारे पत्र आहे. याशिवाय दिवाळी संमेलन, माहेश्वरी देवीचा उत्सव याविषयी छायाचित्रांसह वृत्तान्त आहे. चॅरिटीजच्या शिस्तबद्ध उपक्रमांना सलाम!

*

लेख क्रमांक ३

# दूरदेशातून-
# LEADERSHIP

-By Sujan Rane
from USA. Sujanrane@yahoo.com

*(शीर्षक इंग्रजीतच असावे असा लेखकाचा आग्रह आहे. -संपादक)*

इतिहासाकडे पाहिलं तर आपल्याला कळते की राष्ट्रे मोठी होतात कारण त्यांचे पुढारी मोठे असतात. जेव्हा राष्ट्रांना संकुचित दृष्टीचे व चारित्र्यहीन पुढारी मिळतात तेव्हा राष्ट्रं धुळीला मिळतात. युरोपमध्ये Napoleon, Churchill, DeGaulle, Lenin सारखे पुढारी होवून गेले म्हणून ती राष्ट्रं जगाच्या इतिहासात मोठी झाली. हिंदुस्थानाच्या इतिहासाकडं पाहिलं तर; आपल्याला चंद्रगुप्त मौर्य व सम्राट अशोक ह्या गुप्तकालीन योद्ध्यांचे, तसंच मोगलांच्या राजवटीतले अकबर बादशाह यांची नावं जगाच्या इतिहासात सापडतात. शिवाजीचं नाव महाराष्ट्रापुरते मर्यादित असलं तरी एक ध्येयनिष्ठ हिंदू राजा मोगलांना टक्कर देण्यात यशस्वी झाल्यामुळे त्यांचं नाव जगाच्या इतिहासात नक्कीच घेतलं जातं. ब्रिटीश लेखक Rawlinson आणि Grant Duff यांची पुस्तकं वाचल्यावर कळते की शिवाजी किती मोठे होते. दिल्लीच्या Rupa Publications Pvt. Ltd. यांनी नुकतंच छापलेलं पुस्तक -Shivaji - The Grand Rebel By Dennis Kinkaid - वाचण्यासारखं आहे. kinckaid (१९०५-१९३७) हे एक ICS Officer होते व ते १९२८ साली मुंबईला आले होते. खवळलेल्या समुद्रात पोहताना १९३७ साली ते मरण पावले. अशी परदेशी लेखकांची पुस्तकं वाचल्यानंतर शिवाजीचं महात्म्य पटते. त्यांच्यासारख्या पुढाऱ्यांनी मराठी साम्राज्याचा पाया रोवला म्हणून मराठी साम्राज्य पेशव्यांपर्यंत टिकलं. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला बाळ गंगाधर टिळक, बिपिनचंद्र पाल व लाला लजपतराय यांच्यासारखे ब्रिटीशांना उघड उघड विरोध करण्याचं धाडस दाखवणारे पुढारी होवून गेले म्हणून हिंदुस्थानी स्वातंत्र्याच्या लढ्याला एक दिशा मिळाली. महात्मा गांधी, नेहरू व सरदार पटेल या तिघांनी मुख्यतः हा लढा बळकट करून स्वातंत्र्य मिळवलं ही बाब स्तुत्य आहे यात शंका नाही. परंतू ५६३ संस्थानं एकत्र आणून हिंदुस्थान (त्यात कित्येक हिंदू व मुस्लिम संस्थानं स्वतंत्र होण्याच्या तयारीत असतानासुद्धा) एकत्रित व मजबूत राष्ट्र व्हावं ही दूरदृष्टी फक्त सरदार पटेल यांनाच होती. नाहीतर हिंदुस्थानचे आज आपल्याला तुकडे तुकडे दिसते असते. या संदर्भात ``Sardar Vallabhbhai Patel - India's Iron Man- By Balraj Krishna, Cuffe Parade, Mumbai हे पुस्तक वाचल्यानंतर या विधानाची प्रचिती येईल.

हा लेख एखाद्या राष्ट्रीय पक्षाच्या दृष्टिकोनातून पहावा किंवा तशी त्याला कलाटणी मिळावी असा माझा उद्देश मुळीच नाही. पण माझ्याकडे कित्येक भारतीय इथे परदेशात वर्षानुवर्षे राहूनसुद्धा हिंदुस्थानाकडे लिडरशीपच्या बाबतीत मोठ्या कळकळीने पहात असतात. नरेंद्र मोदींसारखे धोरणी व धैर्यशील पुढारी हिंदुस्थानाला बऱ्याच वर्षांनी मिळाले आहेत असं वाटते. कारण जो पुढारी काँग्रेससारख्या जुन्या पक्षाला हरवतो, जो राष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी धडपड करतो, जो पुढारी १७ महिन्यात २४ राष्ट्रांना भेट देवून त्यांना हिंदुस्थानाबरोबर बरेच करार करायला लावतो व ते इथे नुसताच थांबत नाही तर तो पाकिस्तान सारख्या शत्रूराष्ट्रात जावून तिथल्या नेत्यांना भेटून येतो, तो एक धोरणी पुढारी आहे असं वाटणं साहजिक आहे. ह्या संदर्भात एक किस्सा नमूद करण्यासारखा आहे. हायझनहोवर जेव्हा अमेरिकेचे अध्यक्ष होते, तेव्हा त्यांना न्यूयॉर्कमध्ये एक रस्ता बांधून पाहिजे होता. म्युनिसिपालिटीचे इंजिनीयर म्हणाले, 'असा रस्ता होणं शक्य नाही.' त्यावर हायझनहोवर म्हणाले, 'तुम्ही काहीही करा, जुन्या इमारती पाडा, वाटेल ते करा पण मला असा रस्ता न्यूयॉर्कमध्ये बांधून पाहिजे.' झालं. लवकरच तसा रस्ता बांधून तयार झाला. याला म्हणतात लिडरशिप. जेव्हा असे पुढारी एखाद्या राष्ट्राला लाभत असतात तेव्हा त्या राष्ट्राची प्रगती झपाट्याने होत असते. नाहीतर कायद्याची चाळण करत बसायचं, फाईल्स एका दप्तरातून दुसऱ्या दप्तराकडे हलवत रहायचं, सीनियर आणि ज्युनिअर ऑफिसर्समध्ये वायफळ चर्चा करायची आणि शेवटी निष्पन्न काही नाही. अशांनी राष्ट्राची प्रगती खुंटते. लीडरशीप हा प्रगतीचा पाया आहे हे विसरता कामा नये. चायनामध्ये माओ त्से तुंगपासून भराभर पावलं उचलली गेली म्हणून आज तिथे जबरदस्त आर्थिक प्रगती दिसून येते. १९४७ साली जेव्हा हिंदुस्थान स्वतंत्र झाला त्यानंतर एकाच वर्षातच चायनाने प्रगतीचा उच्चांक गाठायला सुरुवात केली. त्या अवधीत आज चायना कोठे आहे व आपण कोठे आहोत ही बाब विचार करण्यासारखी आहे. अर्थात् तिथे कम्युनिस्ट सरकार आहे व आपल्याकडे लोकशाही आहे. पण स्वातंत्र्य म्हणजे हलगर्जीपणा नव्हे याची आपल्याला जाणीव असायला हवी. लीडरशीप म्हणजे निर्भयता व निर्दयता हे गुण आलेच. एखाद्या कुटुंबाचा प्रमुख कमकुवत असेल तर त्या कुटुंबाला अनेक दुःखांना तोंड द्यावं लागतं त्याचप्रमाणे एखाद्या राष्ट्राची गत असते. राष्ट्राचा प्रमुख निर्भीड व कित्येकदा निर्दयसुद्धा असावा लागतो. इंदिरा गांधी यांच्यात लीडरशिप गुण मोठ्या प्रमाणात होते कारण त्यांनी न डगमगता जनरल मानेकशॉला बांग्लादेशवर चाल करून सांगितले आणि तो प्रश्न लवकर सोडवला. २१व्या शतकात हिंदुस्थान जर एक बलवान राष्ट्र व्हायचं असेल तर आपल्याला अशा प्रकारचं पुढारीपण हवं.

चायना व इजिप्तप्रमाणे हिंदुस्थान हा एक जुना देश आहे. पण असं असून आपल्याकडची गरिबी, अस्वच्छता व सगळीकडे सरकारी दप्तरात हलगर्जीपणा पाहून जगाच्या नकाशात हा एक मागासलेला देश आहे असं लेबल चिकटवलं जातं. हा डाग आपल्याला काढून टाकायचा असेल तर आपल्याला चौफेर प्रगतीची गरज आहे आणि त्यासाठी कणखर लीडरशीपची अत्यंत गरज आहे.

✳

## परीक्षा

- श्री. हेमंत विनायकराव तळपदे

आल्या आल्या परीक्षा आल्या
गंपूचा भार वाढू लागला
दहा विषय, तीन भाषा
व्याकरण, निबंध तयारी करू मी कसा?
ताई, माई, आबांचे डोळे होते वटारले
सहाय्य करण्या केवळ 'नवनीत' वाटे सरसावले
क्रिकेट; कबड्डी, टी.व्ही. त्याला अनोळखी झाले.
चेंडू अन् गोट्या दूर फडताळात रुसून बसले.
विचार करून करून गंपूचे डोके भणभणू लागले.
स्वकीयांच्या अपेक्षांचे बोजे गंपू वाहू लागला.
लाडका सुकुमार बछडा त्या अपेक्षांना बळी पडला
जीवनाचे खरे स्वातंत्र्य त्याने स्वतःच दूर लोटले
चार भिंतींच्या कोंडमाऱ्यात ते पुस्तकी लीन झाले.
त्याची दयनीय अवस्था पाहून परीक्षाही द्रवित झाल्या
पटापटा दिवस पालटून त्या परीक्षा संपून गेल्या.

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



# अद्‌भुत गोष्टींचा संग्रह

**विनय त्रिलोकेकर**

**भूतांच्या गोष्टी**
**२. लक्ष्मी निवास - एक शापित घर?**

होती एक संध्याकाळ. अलकची सर्वात मोठी मुलगी, पुष्पा आपल्या मित्र-परिवाराबरोबर बाहेर अंगणांत खेळत होती. सहज तिची नजर एका व्यक्तीकडे वेधली गेली. कुंपणाच्या भिंतीवर बसून तो त्यांच्या बेडरूमच्या खिडकीकडे टक लावून पाहत होता. त्याचे लाललाल डोळे, केसाळ अंग, डोक्यावर लांब पिंजारलेले केस, भीतीदायक चेहरा सारे भीषण विक्षिप्त! अमानवी! अचानक त्याने उडी मारली. झूम- सूर. एखाद्या वाऱ्याच्या आंधीप्रमाणे इमारतीच्या द्वाराकडे झेपावला. आणि हे काय? 'अगं कुंदा, पाहिलेस का? तो माणूस त्या समोरील खांबात शिरला नं गं.' 'कोणता माणूस? मला नाही दिसले. काय गं मुलीनो, तुम्हाला काही दिसले का?' 'नाही!', सर्वजणी एकदम ओरडल्या. तिलाही भास झाला असेल का?पुष्पाच्या अगदी जवळून धावत जाणाऱ्या त्या अमानुष व्यक्तीला तिच्या व्यतिरिक्त कोणीच कसे बघितले नाही? पण तिने झालेला प्रकार आपल्या आईस सविस्तर सांगितला.

इस्सेल ही एक यहुदी बालिका. नुकतीच यौवनात आलेली मुलगी. ती जवळच राहत असे- भालचंद्र रोडवरच तिचे घर होते. दोन परिवारांचा घरोबा होता. तिचे त्यांच्याकडे येणेजाणे स्वाभाविकच. पुष्पाचा तिला फार लळा. पुष्पा आणि इस्सेलमध्ये ५ ते ६ वर्षांचा फरक असेल. अलक कामात असावयाची तेव्हा इस्सेल, पुष्पा व तिच्या इतर दोन लहान बहिणींचा सांभाळ करावयाची. काही खरेदी करणे असो, कोठेही जाणे असो मग इस्सेलला अलकची व अलकला तिची गरज लागावयाची. अशाच एका सायंकाळी अलक व इस्सेल घरी येत होत्या. इस्सेलचे वडील आजारी होते. त्यांच्यावर के. ई. एम. हॉस्पिटलमध्ये उपचार चालू होते. ते उपचारांना चांगलाच प्रतिसाद देत होते, हे इस्सेलला खुद्द डॉक्टरनी आजच सांगितले आणि एक- दोन दिवसात त्यांना डिसचार्ज मिळणार या आशेने इस्सेल आनंदात होती. तिच्या वडिलांना बघूनच त्या दोघी येत होत्या.

'माझे पपा लौकर घरी येणार! अलक-ताई आता खूप बरे वाटते.'

'तुझा देवावर विश्वास आहेना? मग त्याच्यावर भिस्त टाक.'

दोघी बोलण्यात मग्न होत्या. टिळक ब्रिजच्या पायथ्यापाशी कधी येऊन पोहोचलो हे त्या दोघींना कळलेही नाही. रात्रीचे ८ वाजले असावेत. सर्वत्र शुकशुकाट होता. रस्त्यात चीटपाखरू नव्हते. हिंदू कॉलनी गल्ली १, २. एकमेकांचा हात हातात घेऊन दोघीही झटपट पाऊले उचलीत घराच्या दिशेने येऊ लागल्या. आज हा परिसर फार गजबजलेला आहे, रस्तोरस्ती विजेच्या दिव्यांचे खांब थोड्या-थोड्या अंतरावर पसरलेले दिसतात. पण त्या काळी तसे नव्हते. रस्त्यावर विजेचे दिवे नव्हते. होते ते बॉम्बे गॅसचे मिणमिणते दिवे आणि दिव्यांच्या खांबातील अंतरही फार. त्यात हिंदू कॉलनीत झाडेदेखील बरीच. मग दिवसाही तसा अंधारच तेव्हा रात्रीचे काय विचारता? दोघींच्या एकमेकींच्या हाताची पक्कड अधिकच घट्ट झाली. भालचंद्र रोडच्या नाक्यावर आल्या. डावीकडे वळणार इतक्यात अलकचे लक्ष वळणावरील वाड्याच्या बांधावर बसलेल्या माणसाकडे आपोआप खेचले गेले. तो इसम अमानवी वाटत होता. तो त्यांच्याकडे रागीट व खुनशी नजरेने बघत होता. आणि काही क्षणात त्याने झेप घेतली.

'इ---स---से-- ल, चल धाव! इससेल पळ ---तो आला!', अलक जोरात किंचाळली आणि इस्सेलचा हात झटकून अलक स्वत:च्या वाड्याच्या दिशेने पळू लागली. पाठीमागून धावण्याचा आवाज ऐकू येत होता. इस्सेल आपल्या मागून पळत असावी असे अलकने गृहित धरले. बाळाराम दारातच होते. तरीही घराचा दरवाजा बंद केल्यावर काहीसे बरे वाटले. अलकची खात्री होती. इस्सेल देखील आपल्या घरी सुखरूप गेलीच असणार! दोघी एकदमच धावू लागल्या आणि तिचे घर अगोदर येणार, मग ती जरूर अगोदरच पोहोचणार. मात्र तसे घडले नाही. काय झाले असावे?

इस्सेल सकाळीच त्यांच्या घरी आली. ती अतिशय घाबरलेली होती. अलकने गोंजारत-गोंजारत विचारले, 'काय ग इस्सू झाले तरी काय? बरे वाटत नाही? काय होत आहे?'

'अहो पुष्पाची आई, कालचा तो माणूस - अहो, तो मनुष्यच नव्हता.'

'काय म्हणतेस?'

' होय हो, तो माणूस नव्हता.मला त्याने घेरले आणि दटावून विचारले, 'अगं कारटे, माझ्या वाटेत का आलीस? आता भोग त्याचे परिणाम. मी त्या घराच्या मालकीण बाईच्या पाठीमागे होतो. तू मध्ये आडवी आली नसतीस तर मी माझा डाव साधला असता. तुला माफी नाही!' आणि तो एकदम नाहीसा झाला. चक्क हवेत!'

अलकने ही घटना बाळारामांच्या कानी घातली.

"Essel, don't worry. Today evening I shall accompany you two. We shall go together. Your papa is getting discharge in a day or two, isn't he? Anyway I wanted to see him. Forget about yesterday's incidence. Probably it must be imagination of you two – you and Pushpa's mom.", बाळारामने तिला काहीसे समजाविले. पण आता त्यांना शंका येऊ लागल्या

`Thank you Pushpa's Baba.'

`Thank You कसले? तू मला मुली सारखीच. संध्याकाळी जाऊ.'

ठरल्याप्रमाणे बाळाराम दोघींसोबत हॉस्पिटलात गेले. पीटर नाझरेथ (इस्सेलचे वडील) ह्यांच्या बरोबर चांगल्या गप्पागोष्टी झाल्या. डॉक्टरही भेटले. आज शनिवार असल्यामुळे सोमवारच्या डिस्चार्जचे नक्की झाले. पण तसे घडायचे नव्हते. रविवारी बाळारामला फोन आला, 'आपके मित्र मिस्टर पीटर सीरियस है. तुरन्त उनकी लडकीको लेकर आजाना' तिचे वडील इस्सेल बरोबर शेवटी बोलूही शकले नाही. ते सारे इस्पितळात जाण्याच्या क्षणी पीटर मरण पावले. अचानक असे काय घडले की एक माणूस उपचारांना चांगला प्रतिसाद देत असताना तडकाफडकी मरतो? डॉक्टरना देखील नवल वाटत होते. मृत्यूचे कारण सांगितले गेले - मेंदूत रक्तस्त्राव! पण ब्लडप्रेशर नॉर्मल , मधुमेह नाही, टेन्शन नाही. आता मात्र बाळाराम वेगवेगळ्या शक्यतांचा विचार करू लागले. उपाय शोधू लागले. तांत्रिक-मांत्रिकावर त्यांचा विश्वास नव्हता, पोलिसात जाणे अलकला मंजूर नव्हते आणि घर सोडणे आप्पांना मान्य नव्हते. मग ह्यावर तोडगा काय? असे ठरले; सत्यनारायणाची पूजा घालणे. पूजा व्यवस्थित पार पडली. भयानक असे काही न घडता काही काळ लोटला. सर्व ठीक होते. परिवारही वाढला होता. चौथी मुलगी जन्माला आली. अलक लहान बाळाला घेऊन घरी आली. आता अलकला त्रास होण्याचे बंद झाले होते. काळभैरवच्या देवळातून नाडा आणून सर्वांच्या मनगटांवर बांधला तसेच वज्रेश्वरीचा अंगारा नेहमी सर्व लावू लागले. अप्पा मात्र हे मानीत नव्हते. नाडा-अंगारे ह्यांना अप्पांचा नकार.

शेवटी घडायचे तेच घडले. अप्पा आजारी झाले. आजाराची लक्षणे तीच. तातीना होती तीच. तापाने अंग फणफणणे आणि फोडांनी अंग भरून जाणे. आता बाळाराम मनातून अतिशय घाबरले. घर सोडण्याचा निर्णय योग्य वाटू लागला. हो-नाही करताकरता अप्पा घर सोडण्यास राजी झाले. आणि सर्व-अप्पा, बाळा, अलक व चार मुली (अजून मुलाचा, म्हणजे माझा जन्म होणे बाकी होते) असा सर्व परिवार,अशा रीतीने दादरचे घर सोडून ठाकुरद्वार येथे भाड्याच्या घरात राहू लागले. अप्पा आजारातून उठू शकले नाहीत. बाळारामांचा अंत झाला. त्या घराच्या बाबतीत फसगत झाली. म्हणतात नं, 'जे होते ते चांगल्याच साठी!'

काही काळानंतर आणि कोर्ट-कचेरी करीत-करीत घर-मालकीचे हात बदलले. आऊट ऑफ कोर्ट सेटेलमेंट करून नवीन मालकाने दोन मजले वाढविले. प्रॉपर्टीची कागद-पत्रे खिशात तर टाकली, पण आनंद किती काळ मिळवला? देव जाणो. काही वर्षांने नव्या मालकाचा मोठा मुलगा मला भेटला.

'पिताजी कैसे है?' मी विचारले.

'वो कबके गुजर गये.'

'माताजी?'

'बिमार है. समजता नही क्या हुआ है- डॉक्टरभी परेशान है. पुरे अंगपर फोडी!'

या त्याच्या वाक्याने मनात एक शंका आली - घर शापित तर नसेल?

आपणच ठरवा.

*

## पाठारे प्रभु महिला समाज

पाठारे प्रभु महिला समाजातर्फे रविवार दि. २४ एप्रिल २०१६ रोजी सायंकाळी ४ वाजल्यापासून चैत्राचे वासंतिक हळदीकुंकू पाठारे प्रभु को. ऑप. हाऊसिंग सोसायटी सांस्कृतिक केंद्र, प्रभु नगर, गायत्री मंदिरा शेजारी, १२ वा रस्ता, खार (प.) येथे आयोजित केले आहे. त्या दिवशी विविध चढाओढी घेण्यात येतील. त्याशिवाय नवीन विश्वस्तांची निवड करण्यासाठी विशेष सर्वसाधारण सभा त्याच दिवशी त्याच सभागृहात घेण्यात येईल. तेव्हा सर्व सभासद भगिनींनी हजर रहावे.

*

रविवार, दिनांक २८/२/१६ रोजी पा. प्र. हाऊसिंग सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्रात सायंकाळ भरास आली. पा. प्रभु महिला समाजाच्या १०१ वा वार्षिक बक्षिस समारंभाचे निमित्त होते. या समारंभाच्या अध्यक्षा होत्या डॉ. धनगौरी नारायण शेणवी. या समारंभाची सुरुवात ईशस्तवनाने झाली. ईशस्तवन, अध्यक्षाभिनंदन, विद्यार्थिनी गौरवगीत नेहमीप्रमाणेच कवयित्री नलिनी तळपदे यांच्या समर्थ लेखणीतून उतरलं होतं. सौ. अक्षदा तळपदे यांनी ते सुरेल केलं. तबल्यावर श्री. प्रदीप राणे होते तर; संवादिनीवर शेषनाथ पावसकर. महिला समाजाच्या अध्यक्षा सुबोध

(पान ५ कॉलम १ वर)

# ''प्रेमस्वरूप ताई... वात्सल्यसिंधु ताई!''

## - अपर्णा उदय कीर्तिकर

आपल्या सगळ्यांचं आयुष्य म्हणजे वेगवेगळ्या नात्यांचा रेशमी गोफ असतो. जन्मापासून ही नाती तयार होतात. काही नाती रक्ताची असतात तर काही परिस्थितीनुसार निर्माण होतात. काही नाती थोड्या काळापुरती असतात तर काही जन्मभर पुरतात.

त्या नात्यांमधील एक नातं मात्र असे असते की जसा काळ उलटत जातो तसे ते अधिक मुरत जाते. आणि मग त्या नात्याचा स्वाद आपल्या जगण्याला अधिक रसपूर्ण बनवितो. हे नातं असते पती-पत्नी मधील.

एकमेकांना अपरिचित असलेले दोघेजण कुठल्याशा अगम्य योगायोगाने, कुणा तिसऱ्याच्या प्रयत्नाने एकत्र आले आणि बघता बघता एकमेकांचे जीवनसाथी बनले ते म्हणजे 'कु. उषा यशवंत आनंदराव अजिंक्य व श्री. नंदकिशोर गोविंदराव नारायण विजयकर.''

उषा म्हणजे आमची ताई. सर्व भावंडांत मोठी. नावाप्रमाणे ताईपणा दाखविला. पण 'ताईगिरी' कधी केली नाही. मुळातच शांत, समंजस स्वभावाची असल्याने आमच्या हातून चुका झाल्या तरी तिने कधी राग बाळगला नाही. आम्हा सर्वांना समजून घेतले.

स्वत:च्या काही सवयी, आवडी-निवडी बदलल्या. कधीही कोणालाही कसलाही त्रास होणार नाही याची काळजी घेऊन भावोजींना आश्वासक सोबत केली. स्त्रिया सांसारिक जबाबदारीतून कधीच मुक्त होत नाहीत हे त्रिकालाबाधित सत्य तिने जाणले.

आमचे भावोजी म्हणजे सदा हसतमुख व मिष्कील स्वभावाचे. कर्तव्यदक्ष असलेले भावोजी आजही सामाजिक कर्तव्य म्हणून पाठारे प्रभु हाऊसिंग सोसायटीचे कार्यवाह म्हणून उत्साहाने काम करीत आहेत.

चांगली माणसे ही नशिबानेच मिळतात. ताई व भावोजींच्या रुपाने ती आम्हाला मिळालीत.

८ फेब्रुवारी रोजी त्यांच्या विवाहाला पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेत. या टप्प्यावर या नात्याला नवी पालवी फुटते आणि हा नवा बहर पुढच्या वाटचालीसाठी नवी उमेद व नवा उत्साह देणारा ठरतो.

विवाह सुवर्ण महोत्सवी हा सोहळा डॉ. अर्चना व अमेय या दोन्ही मुलांनी नातेवाईक व हितचिंतकांच्या उपस्थितीत आनंदाने साजरा केला. तसाच विवाह माणिक (६० वर्षे) महोत्सव सोहळाही आपण असाच साजरा करूया अशी श्री स्वामी समर्थांच्या चरणी प्रार्थना.

---

(पान ४ कॉलम ४ वरून)
प्रधान यांच्या प्रस्ताविकानंतर उपाध्यक्षा सौ. साया नवलकर यांनी समारंभाच्या अध्यक्षा आणि सन्मानप्राप्त अभिजनांचा परिचय करून दिला. हे सन्माननीय होते - सौ. नीला सुधीश तळपदे, डॉ. संध्या देसाई-पुरी, श्रीम. संध्या नारायण विजयकर, कु. क्षमा दिलीप वाझकर, कु. अंबुजा प्रदीप नवलकर, सौ. सुरुची धुरंधर-प्रधान, कु. वैजयंती विश्वास अजिंक्य आणि डॉ. मोनिका प्रदीप वेलकर. या सर्वांचा डॉ. शेणवींच्या हस्ते रौप्यपदक देऊन सन्मान करण्यात आला. खास म्हणजे या सोहळ्यात गौरवास्पद कामगिरी करणाऱ्या भगिनींचा विशेष गौरव करण्यात आला. सौ. बागेश्री धुरंधर-परीख, डॉ. सुरेखा बन्सीधर धुरंधर, कु. रोशनी प्रभात जयकर, कु. विनिता सुरेश नवलकर, सौ. पूजा यतिन धुरंधर, सौ. पूर्वा राव-जयेश, कु. पल्लवी अनिल गोरक्षकर, सौ. विदुला निखील कोठारे, सौ. प्रणाली सौरभ धराधर, कु. कौमुदी सुश्रुत राणे, कु. सायली मिलिंद धराधर, कु. निशीता नीलेश नायक, कु. अपूर्वा नीतिन कोठारे आणि सौ. नीता नीतल तळपदे अशा चौदाजणींच्या आपापल्या क्षेत्रात केलेल्या कामगिरीची दखल या विशेष गौरव सोहळ्यात घेण्यात आली. याशिवाय विविध परीक्षांतील यशस्वी गुणांकीत विद्यार्थिनी, समाजाच्या विविध स्पर्धांत यशस्वी झालेल्या महिला यांनाही या गौरव सोहळ्यात मानाचे स्थान होते. हॉल छोटा; पण संस्थेचे हे कार्य मोठे. ज्यामुळे सर्व यशस्वी भगिनींची दखल घेऊन कृतज्ञता व्यक्त झाली. मंचावरील सर्वच मानकऱ्यांनी आपापले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. शेणवी यांनी स्त्रीयांसाठी योग साधना घरगुती कामांमधूनही साधता कशी येते; ते विस्ताराने सांगितले. वयाच्या ८८ वर्षांपासून ते छोट्या कुमारवयीन बालांपर्यंत असणाऱ्या बक्षिस विजेत्यांचे / मानकऱ्यांचे त्यांनी कौतुक केले. कौतुक करण्याजोग्याच होत्या साऱ्याजणी! या साऱ्यांना कौतुकाचे वाटेल, प्रेक्षक - श्रोत्यांना आनंदाचे वाटेल असे सुगम निवेदन सौ. नीता सेंजित यांनी केले. सूत्र सांभाळणे ही अवघडच जबाबदारी. पण आपल्या सूत्रसंचालनातून त्यांनी कार्यक्रम उंचीवर नेऊन ठेवला. या सोहळ्यानिमित्ताने अनेकांचे देणगीरूपाने हात पुढे आले. त्याची माहिती सौ. रश्मा विजयकरांनी दिली. आभार मानले सौ. नूतन कीर्तिकर यांनी. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची समाप्ती झाली. तदनंतर दिल्या गेलेल्या कुल्फीने कार्यक्रमाची गोडी अधिकच वाढवली. महिला समाजाची उत्तरोत्तर अशीच वाटचाल होत राहील याची ग्वाही देणारा हा समारंभ होता.

*

---

## पाठारे प्रभु सोशल समाज

पाठारे प्रभु सोशल समाजाचा १२८ वा वर्धापन दिन व पुरस्कार सोहळा गुढीपाडवा शुक्रवार दि. ८ एप्रिल २०१६ रोजी सायंकाळी ५ वाजता सुप्रसिद्ध आर्किटेक्ट श्री. बॉबी नारायण विजयकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा होणार आहे. तरी ज्ञातीय सर्व बंधू भगिनींनी व पारितोषिक आणि सुवर्णपदक विजेत्यांनी पाठारे प्रभू को-ऑप सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात, (प्रभु नगर, १२ वा रस्ता, खार (प.) गायत्री मंदिराशेजारी) त्यावेळी हजार रहावे.

त्याप्रसंगी खगोल शास्त्रात वैज्ञानिक शोध लावण्यात यश संपादन केल्याबद्दल डॉ. संजीव विष्णु धुरंधर व कु. विनीता सुरेश नवलकर यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

पुढील व्यक्तींना सुवर्णपदक व स्मृतिचिन्ह देण्यात येईल.

१. कै. श्री. आर. जी. विजयकर स्म. ज्ञाती व ज्ञातीबाहेरील ज्ञातीसेवा सुवर्णपदक - डॉ. प्रदीप गजानन विजयकर

२. कै. श्री. सच्चिदानंद मो. नवलकर स्म. ज्ञातीसेवा सुवर्णपदक - सौ. अक्षदा अजित तळपदे

३. कै. श्रीम. प्रमिला मो. जयकर स्म. ज्ञाती व ज्ञातीबाहेरील समाजसेवा सुवर्णपदक - सौ. ज्योत्स्ना रंजन धैर्यवान

४. कै. श्री. वामनराव गोरक्षकर स्म. धार्मिक सेवा सुवर्णपदक - श्री. रंजन खंडेराव विजयकर

५. कै. श्री. नारायण मानकर स्म. कै. श्री. शरदकुमार व कै. श्री. सनदकुमार वामनराव कोठारे स्म. 'अभिनय' पुरस्कार - सौ. स्मिता मोहन जयकर

६. श्री. शीतल नागेंद्र तळपदे पुरस्कृत कै. नागेंद्र य. तळपदे स्म. 'हटके' पुरस्कार - श्री. उन्मेश प्रकाश नायक

७. कै. श्री. धवल सुनील धैर्यवान स्म. 'फोटोग्राफी' पुरस्कार श्री. शशांक श्रीकांत रणजीत

८. कै. श्रीम. लक्ष्मी व कै. श्री. माधव मो. प्रभाकर व कै. श्री. वामन प्रभाकर स्म. 'एम.बी.बी.एस.' सुवर्णपदक - डॉ. रोहन परेश नवलकर

९. कै. श्रीम. सीतादेवी व कै. श्री. शंकरलालजी महेश्वरी स्म. ज्ञातीबाहेरील समाजसेवा सुवर्णपदक - कु. उज्ज्वला गोविंदराव आगासकर

१०. कै. श्री. प्रमोद सच्चिदानंद नवलकर स्म. साहित्यसेवा सुवर्णपदक - श्रीमती मृदुला आगासकर जोशी

*

'पाठारे प्रभु सोशल समाज' आणि हौशी कला मंदिर' या दोन्ही संस्थांमार्फत एकत्रित रविवार दि. २९ मे २०१६ रोजी सकाळी ८ वाजल्यापासून 'मिलन सबवे' जवळील 'विलींग्डन क्रिसेंट' मैदानावर, सांताक्रूज (प.) टेनिस बॉल 'बॉक्स क्रिकेटचे सामने (ओव्हरआर्म) आयोजित केले आहेत. महिलांसह इच्छूक व्यक्तींनी अधिक चौकशीसाठी लवकरात लवकर पुढील व्यक्तींशी संपर्क साधावा.

सौ. नीता सेंजित - ९८२०१६६६२८

श्री. जयंत कीर्तिकर - ९८६७९५८५३५

श्री. अतुल जयकर - ९९२०१४२४०२

श्री. रोहिल जयकर - ९८१९०७००८९

*

---

## प्रभु सेमिनरी स्कूल

गुरुवार, दि. १८ फेब्रुवारी २०१६ रोजी सकाळी ११ वाजता प्रभु सेमिनरी शाळेचा क्रीडा महोत्सवाचा बक्षिस समारंभ प्रमुख पाहुण्या श्रीमती वृंदा शाम जयकर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. शाळेच्या कार्यकारी समितीच्या अध्यक्षा श्रीमती उषा शिवराज कोठारे यांनी प्रमुख पाहुण्या व आमंत्रित पाहुण्या सौ. नीता सेंजित ह्यांचा परिचय करून दिला. विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रके, पदके, व ट्रॉफिज वृंदा जयकर, नीता सेंजित व श्री. संतोष नवलकर यांच्या हस्ते देण्यात आली. झोपडपट्टीत व फूटपाथवर रहाणाऱ्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक प्रयोगात व क्रीडा क्षेत्रात दाखवलेली कामगिरी कौतुकास्पद होती. त्याचे सारे श्रेय शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकवर्गाला जाते. कार्यकारी समितीचे विश्वस्त श्री. कुंदन आगासकर, श्री. संजय दळवी, चिटणीस प्रदीप नवलकर, खजिनदार श्री. समीर रणजित ह्यांनी कार्यक्रमाची उत्तम व्यवस्था ठेवली होती.

*

---

## परीक्षेतील सुयश

**एम्.एस्.सी. (होम सायन्स)**

निशिता शेखर धैर्यवान, ए ग्रेड

*

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शालाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणास देणगी

✶ सौ. नंदा (शोभा) नंदकुमार धैर्यवान यांजकडून नातू भैरव आनंद धैर्यवान याच्या जन्माप्रीत्यर्थ (२३-९-२०१५) रु. ५००/-

✶ कु. आरती जयेश कोठारेकडूनआजीव सदस्य रि. ५००/-

✶ सौ. प्रतिमा आणि श्री. विनोद प्रधान यांजकडून त्यांचा नातू ऋषिकेश तेज वेलकर याचा कु. देवश्री कोठारे हिजबरोबर विवाह झाल्याच्या आनंदाप्रीत्यर्थ रु. २५१/-

✳

## अभिनंदन

✶ गुरुत्वीय लहरींवर महत्त्वाचे असे नवीन संशोधन झाले आहे. श्री. संजीव विष्णु धुरंधर यांचा त्यात महत्त्वाचा वाटा आहे. 'जय महाराष्ट्र' सदरात त्याचे सविस्तर चित्रण आले होते. अभिनंदन.

✶ नुकत्याच झालेल्या 'मेक इन इंडिया' च्या 'सांस्कृतिक महाराष्ट्र'चे सूत्रसंचालन श्रेयस तळपदे यांनी केले. अभिनंदन.

✶ कु. रोशनी प्रभात जयकर यांची पत्रकारितेत अतिशय उज्ज्वल कारकीर्द होती. मात्र गेली काही वर्षे त्या फिडीलिटी इंटरनॅशनल, ग्लोबल इन्व्हेस्टमेंट मॅनेजमेंट कंपनीत कार्यरत आहेत. यावर्षी त्यांची या कंपनीत 'डायरेक्टर ऑफ प्रॉडक्ट' म्हणून नेमणूक झाली. या मार्चमध्ये त्यांची इंडिया मॅनेजमेंट टीममध्येही सदस्य म्हणून नेमणूक झाली. अभिनंदन.

✶ नुकत्याच झालेल्या महिला समाजाच्या बक्षिस समारंभात आमच्या कोषाध्यक्ष डॉ. सुरेखा धुरंधर यांचा सत्कार करण्यात आला. बहारीचा भाग म्हणजे आमच्या सदर लेखिका, माजी न्यायमूर्ती सौ. बागेश्री परीख आणि त्यांच्या भगिनी सौ. सुरुची प्रधान यांचाही सत्कार करण्यात आला. एकाच कुटुंबातील तिघींचा एकाच मंचावर सत्कार असा दुर्मीळ योग होता. तिघींचेही अभिनंदन.

✶ Sou Kavita Rajas Rane has been promoted as location credit head in loan department of Kotak Mahindra Bank, Mumbai for her dedicated services of 5 years in the bank. The position is effective from 1st January 2016. congratulations.

✶ Mrs. Vaidehi Shreyas Rane has been appointed as section manager of the power systems team in Beca, Australia. As a section manager, she will be respobsible for the power teams based in Sydney, Melbourne and Adelaide at Beca.

Vaidehi has spent the last two years as a key member of the Sydney power team, working on power projects in the water and industrial markets. During that time, she has been instrumental in building successful ongoing relationships with design construct partners, and she has also acted in a team leadership role within the business.

Vaidehi has been recently promoted to the associate role at Beca and she was also selected for the role of secretary for the Woman's in Engineering Organisation in Sydney.

Congratulations.

✶ श्री. विश्वास अजिक्य यांचा ७-३-१६ रोजी कलाक्षेत्रातील अभ्यासमार्गदर्शनपर लेख प्रसिद्ध झाला. अभिनंदन.

✳

## प्रभुतरुणाची डायरी

### जनन

२३-९-१५ श्री. आनंद नंदकुमार धैर्यवान, पुत्र, खार
०१-०२-१६ सौ. श्वेता आणि अंकुर अरविंद मुकुंद राव, पुत्र, ठाणे

### आत्याबाई नाव बोला

भैरव आनंद धैर्यवान

### नारळ साखर दिला

०५-०३-१६ डॉ. श्री. तन्मय प्रदीप विजयकर, डॉ. कु. ऋतुजा भगत (आं. ज्ञा.)

### नांदा सौख्यभरे

१३-२-१६ कु. देवश्री नीलेश भालचंद्र कोठारे, श्री. ऋषिकेश तेज प्रताप वेलकर
११-२-१६ कु. कुंजिका दिनेश तळपदे, श्री. अलोक अनंत पासतेकर (आं. ज्ञा.)
१३-२-१६ श्री. अक्षत शरद दिनकर जयकर, कु. अवनी टोवळे (आं. ज्ञा.)
२५-२-१६ कु. वैष्णवी रमण त्रिलोकेकर, श्री. विनोद राजेन्द्र नागराल (आं. ज्ञा.)
२७-२-१६ कु. रोशनी यतीन व्यवहारकर, श्री. रामानंद श्रीकांत सरदेसाई (आं. ज्ञा.)

### विवाह सुवर्ण महोत्सव

८-२-१६ श्री. नंदकिशोर गोविंदराव नारायण विजयकर कु. उषा यशवंत आनंदराव अजिंक्य (खार)

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ३१-०१-१६ | श्री. शरद मल्हार व्यवहारकर | वय ८२, | पुणे |
| ०८-०२-१६ | श्री. प्रकाश कमलाकांत आनंदराव कोठारे, | वय ६३, | कांदिवली |
| १४-०२-१६ | श्री. नरेन्द्र पुरुषोत्तम धुरंधर, | वय, | विलेपार्ले |
| २४-०२-१६ | श्री. निखील विष्णुराव कोठारे, | वय ५१, | पुणे |

## पत्र - प्रतिक्रिया

दि. २१-२-१६

माननीय संपादिका,
प्रभुतरुण,
श्रीमती सुहासिनी कीर्तिकर
यांस स.न.वि.वि!

धन्यवाद! पत्र लिहिण्यास थोडासा उशीरच झाला आहे. पण तरीही आपण डिसेंबर २०१५ च्या 'प्रभु तरुण' अंकात 'पॅसेज' ह्या संपादकीय लेखात माझे वडील कै. शाम जयकर यांना अप्रतिम श्रद्धांजली वाहिली आहे. याबद्दल मी व माझे कुटुंबीय आपले आभारी आहोत.

आपले व्यक्तिमत्त्व बहुआयामी आहे. आपण एक उत्तम साहित्यिका आहात व आपल्या भाषा प्रभुत्वामुळे आपला प्रत्येक अंक व त्यातील संपादकीय वाचनीय असते. कै. प्रमोद नवलकरांनंतर आपणही उत्तम 'मृत्यूलेख' लिहिता याचा प्रत्यय आला.

आपण शाम जयकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध कंगोरे अगदी सहजपणे उलगडून दाखविले आहेत. त्यामुळेच वाचकांना त्यांचा परिचय झाला आहे. त्याचा प्रत्यय आपल्या जानेवारी २०१६ च्या 'प्रभुतरुण' अंकात 'पत्र प्रतिक्रिया' या सदरात सौ. उज्ज्वल ब्रह्मांडकर यांनी लिहिलेल्या पत्रात आला. त्यांनी आपल्या सिद्धहस्त लेखणीचा सहजसुंदर परिचय करून दिला आहे. या पत्राद्वारे भावपूर्ण श्रद्धांजली वाहिल्याबद्दल व आमच्या दु:खात सहभागी झाल्याबद्दल उज्ज्वलाताईंचे मी आभार मानते. तसेच आपले व 'प्रभुतरुण' बोर्डाचे आभार मानते.

कळावे!

आपली वाचक,
सौ. निकेता प्रशांत राणे

**Statement about ownership and other particulars about news paper**

**PRABHU TARUN**
**Form IV (See Rule 8)**
**To be published in the first issue after the last day of February**

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Place of Publication | : | B3 Parijat Patel Estate, Jogeshwari, Mumbai-400 102. |
| 2) | Periodicity of Publication | : | Monthly |
| 3) | Printers Name | : | Smt. Suhasini kirtikar |
| 4) | Address | : | Same as above |
| | Editors Name | : | Smt. Suhasini kirtikar |
| | Nationality | : | Indian |
| 5) | Address | : | Same as above |
| 6) | Name & Addres of Individuals who own the News Paper and Partners of Sharehold holding more than one Percent of Capital. | : | Board of Trustees Prabhu Tarun |

I Smt. Suhasini Kirtikar hereby declare that particulars given above are true to the best of my knowledge and belief.

**01-03-2016** **Suhasini Kirtikar**
Mumbai Signature of Publisher

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67